


## म्हाडाचा 'ब्रँड' वापरून ग्राहकांना गंडवणाऱ्या विकासकांचा गेम होणार

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

म्हाडाच्या विश्वासार्ह नावाचा आणि अधिकृत बोधचिन्हाचा (लोगो) गैरवापर करून सर्वसामान्यांची दिशाभूल करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध आता राज्य सरकारने कठोर पवित्रा घेतला आहे. म्हाडाच्या लोगोचा अनधिकृत वापर केल्याप्रकरणी संबंधित विकासकावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश म्हाडाच्या उपाध्यक्षांना देण्यात येतील, अशी खळबळजनक माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानपरिषदेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात आमदार प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते.

म्हाडाने आपल्या नावाचा आणि लोगोचा वापर करण्यासाठी केवळ दोन विशिष्ट प्रकल्पांच्या जाहिरातींसाठी अत्यंत कडक अटींसह परवानगी दिली होती. मात्र, संबंधित विकासकाने या मर्यादेचे उल्लंघन करून इतर प्रकल्पांच्या मार्केटिंगसाठीही म्हाडाच्या नावाचा आधार घेतल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या गंभीर प्रकारामुळे म्हाडाची प्रतिमा मलिन होत असल्याचे सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या चर्चेत अनिल परब आणि प्रविण दरेकर यांनीही उपप्रश्न उपस्थित करून प्रशासनाला धारेवर धरले.

मंत्री शंभूराज देसाई यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेऊन संबंधित विकासकाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. जरी विकासकाने सध्या इतर कोणत्याही प्रकल्पात लोगो वापरत नसल्याचा लेखी खुलासा केला असला, तरी म्हाडा प्राधिकरण या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. या चौकशीअंती जे काही निष्कर्ष समोर येतील, त्यानुसार केवळ नोटीसवर न थांबता थेट पोलिसांत गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई केली जाईल.

शासनाच्या या भूमिकेमुळे म्हाडाच्या नावाखाली स्वतःची पोळी भाजून घेणाऱ्या बिल्डरांचे धाबे दणाणले आहेत. घर घेणाऱ्या सर्वसामान्यांनीही केवळ म्हाडाचा लोगो पाहून फसू नये, तर प्रकल्पाची अधिकृतता तपासून घ्यावी, असा संदेशही या निमित्ताने देण्यात आला आहे.

# नवउद्योजकांचे आझाद मैदानावर आमरण उपोषण तीव्र दुसऱ्या दिवशीही सरकारविरोधात संताप कायम

## मंत्री अदिती तटकरे यांचे दुर्लक्ष? हजारो तरुणाचा जीव टांगणीला

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

अनुसूचित जाती प्रवर्गातील नवउद्योजक आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचे मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेले आमरण उपोषण आज दुसऱ्या दिवशीही तीव्र झाले असून, राज्य सरकारच्या भूमिकेविरोधात उद्योजकांनी संताप व्यक्त केला आहे. महिला व बाल विकास विभागाच्या बाह्यस्रोत मनुष्यबळ पुरवठा निविदेमध्ये अन्याय, भेदभाव आणि प्रशासकीय अडथळे निर्माण झाल्याचा आरोप करत हे आंदोलन उभारण्यात आले आहे.

उद्योजकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या १ डिसेंबर २०१६ च्या खरेदी धोरणानुसार ते पूर्णपणे पात्र असतानाही त्यांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाने ७ मे २०२५ रोजी संबंधित कंपन्यांना तातडीने कार्यादेश देण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, नऊ महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी आहे. मंत्री आदिती तटकरे याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यांचे ओएसडी गायकवाड याना हे प्रकरण मार्गी लावू द्यायचे नाही असा आरोप आंदोलकानी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणात मंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी राजेश गायकवाड यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नस्तीवर नियंत्रण ठेवून शासन निर्णय जाणीवपूर्वक रोखला जात असल्याचा दावा उद्योजकांनी केला आहे. तांत्रिक कारणांचा आधार घेत प्रस्ताव लांबवणे, अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे आणि एका विशिष्ट खाजगी कंपनीला फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आयुक्त वर्षा पवार आता काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




महिला व बाल विकास आयुक्तांनी ९ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्योग व ऊर्जा विभाग आणि महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांच्या सकारात्मक अभिप्रायासह प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. सर्व निकष पूर्ण असतानाही हा प्रस्ताव वारंवार प्रलंबित ठेवण्यात आल्याचे उद्योजकांनी सांगितले.

आतापर्यंत उद्योजकांनी २० हून अधिक वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या असून, तीन वेळा बैठका पार पडल्या आहेत. तसेच आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी सात वेळा शासनाशी पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. यापूर्वी तीन वेळा उपोषण करूनही केवळ आश्वासने मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

उद्योजकांनी आयोगाच्या आदेशानुसार ३५ टक्के कार्यादेश तात्काळ देणे, ९ ऑक्टोबर २०२५ च्या प्रस्तावाला मंजुरी देणे आणि संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षात न्यायासाठी पुन्हा संघर्ष करावा लागत असल्याची खंत व्यक्त करत उद्योजकांनी या आंदोलनाला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळत असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी काही आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावू लागल्याची माहिती समोर येत असून, प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे राज्य सरकारसमोर हा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे.

### "आयोगाचे आदेश धाब्यावर, उद्योजक न्यायासाठी उपोषणावर"

राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाच्या स्पष्ट आदेशानंतरही अंमलबजावणी न होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. एका बाजूला स्टार्टअप आणि उद्योजकतेला चालना देण्याचे धोरण मांडले जात असताना, प्रत्यक्षात पात्र उद्योजकांना न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याचे चित्र समोर आले आहे.

आझाद मैदानावरील उपोषणाचा आज दुसरा दिवस असून, सरकारकडून अद्याप ठोस प्रतिसाद न आल्याने आंदोलन अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सामाजिक न्याय, प्रशासनाची पारदर्शकता आणि उद्योजकांचा विश्वास या तिन्ही मुद्द्यांवर सरकारची कसोटी लागणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# पाच वर्षांच्या पापाचा पाढा वाचणार

## बेकायदा उत्खनन करणाऱ्या 'खाण सम्राटांना' महसूलमंत्र्यांचा थेट इशारा

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील डोंगर पोखरणाऱ्या आणि शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवणाऱ्या अवैध खनिज माफियांवर आता राज्य सरकारने 'सर्जिकल स्ट्राईक'ची तयारी केली आहे. मागील पाच वर्षांत देण्यात आलेल्या खाण परवानग्यांची ए टू झेड चौकशी करून, ज्यांनी नियम धाब्यावर बसवले आहेत, त्यांच्यावर दंड, व्याज आणि थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. येत्या तीन महिन्यांत हे विशेष सर्वेक्षण पूर्ण करून दोषींवर कडक कारवाई केली जाणार आहे.

भिवंडीसह कोकण पट्ट्यातील बेकायदा उत्खनन आणि खनिज तस्करीमुळे पर्यावरणाचे आणि महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याचा मुद्दा आमदार सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. या चर्चेत नाना पटोले, दिलीप लांडे आणि राजू खरे या आमदारांनीही आक्रमक पवित्रा घेत प्रशासकीय आशिर्वादाने सुरू असलेल्या या 'काळ्या' धंद्यावर ताशेरे ओढले.



याला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले की, आता केवळ कागदी घोडे नाचवले जाणार नाहीत, तर 'जीपीएस' (GPS) आणि 'गुगल मॅपिंग'च्या (Google Mapping) साह्याने प्रत्येक खाणपट्ट्याचे अचूक सर्वेक्षण केले जाईल. खाणपट्टा, पर्यावरण मंजुरी, स्फोटक परवाना आणि ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला यांपैकी एकही कागदपत्र कमी असल्यास तो स्टोन क्रशर किंवा खाण प्रकल्प तत्काळ सील केला जाईल. विशेष म्हणजे, या अवैध व्यवसायात जर महसूल विभागाचे अधिकारी सहभागी असल्याचे आढळले, तर त्यांच्यावरही कठोर कारवाईची टांगती तलवार असेल.

जिल्हाधिकाऱ्यांना या मोहिमेसाठी थेट जबाबदार धरण्यात आले असून, बेकायदा साठा जप्त करण्याचे आणि विनापरवाना सुरू असलेले उत्खनन एका रात्रीत बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्यांनी प्रामाणिकपणे परवाने घेतले आहेत त्यांना कोणताही त्रास दिला जाणार नाही, मात्र 'नियम मोडणाऱ्यांची आता खैर नाही', असा स्पष्ट संदेश या निमित्ताने सरकारने दिला आहे.

# औषध प्रति रोधक क्षयरोगाचे रुग्ण बरे होण्याचा दर गेल्या ८ वर्षात दुप्पट होऊन ८१ टक्क्यांपर्यंत पोहचला

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून क्षय रूग्णांसाठी उच्च दर्जाच्या निदान सेवा, नवीन औषधोपचार पद्धती आणि सातत्यपूर्ण रुग्ण सहाय्य व पाठपुरावा करण्यात येतो. परिणामी, औषध प्रतिरोधक क्षयरोगाचे (DRTB) रुग्ण बरे होण्याचा दर गेल्या ८ वर्षात दुप्पट होऊन ८१ टक्क्यांपर्यंत पोहचला आहे. जागतिक क्षयरोग दिन २४ मार्च रोजी असून २०२६ चे "Yes! We can end TB!"Led by countries. Powered by people" घोषवाक्य आहे. मजबूत राष्ट्रीय नेतृत्व आणि सक्रिय समाज सहभाग यांच्या मदतीने क्षयरोगाचे निर्मूलन साध्य करता येऊ शकते, ही यंदाच्या वर्षाची संकल्पनेतून अभिप्रेत आहे.

विविध आरोग्य संस्थांमध्ये वर्ष २०२५ मध्ये मुंबईत एकूण ५४ हजार ३९० क्षयरोग रुग्ण नोंदवले गेले. पैकी ४८ हजार ८३५ रुग्ण मुंबईचे रहिवासी होते. यापैकी ४० टक्के रुग्ण एक्स्ट्रा पल्मनरी, ६ टक्के बालरुग्ण आणि ८ टक्के औषध प्रतिरोधक क्षयरोगाचे (DRTB) प्रकारातील होते.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारने २०२५ मध्ये "क्षयरोग (TB) मुक्त भारत अभियान" सुरू केले. या



कार्यक्रम अंतर्गत १३ लाख ८ हजार २०० संवेदनशील लोकसंख्येची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १ लाख २४ हजार ७७४ संशयित रुग्णांचे एक्स-रे करण्यात आले.

मुंबईतील आरोग्य संस्थांच्या ठिकाणी ४५ Cartridge Based Nucleic Acid Amplification Test (CBNAAT) आणि ३४ TruNAAT पोर्टेबल मशीन उपलब्ध आहेत. या संयंत्राद्वारे क्षयरोग व रीफॅम्पीसीन औषध-प्रतिरोधक क्षयरोगाचे मोफत व अचूक निदान केले जाते. तसेच आता केंद्रीय क्षयरोग विभागाकडून ४ पॅथोडिटेक्ट मशीनही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संयंत्राद्वारे क्षयरोग तसेच रीफॅम्पीसीन व आयसोनाझेड औषध-प्रतिरोधक क्षयरोगाचे देखील निदान करणे होईल. सध्या २ पॅथोडिटेक्ट संयंत्रे सर जे. जे. रूग्णालय व IRLजीटीबी प्रयोगशाळेत उपलब्ध झाली आहेत. वर्ष २०२५ मध्ये एकूण २ लाख मॉलीक्यूलर (NAAT) चाचण्या करण्यात आल्या.

# 'सिग्नल शाळा' सारख्या विधायक उपक्रमांना समाजातील सर्व घटकांकडून हातभार लाभावा- महापौर

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

बेघर, स्थलांतरीत, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणारी सिग्नल शाळा मुंबई महानगरात सुरु झाली. नव्या शैक्षणिक धोरणांना अंगीकारत सुरु झालेला हा अभिनव प्रयोग विकसित भारत प्रयत्नांमध्ये मोलाचा भाग ठरणारा आहे. येत्या काळात देश-विदेशातील पर्यटक मुंबईत येतील, तेव्हा या सिग्नल शाळेला आवर्जून भेट देतील, असा विश्वास मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी व्यक्त केला. मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी कार्यालय अर्थसहाय्यित, बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत तसेच समर्थ भारत व्यासपीठ संचालित सिग्नल शाळेचे लोकार्पण मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते आज (दिनांक २३ मार्च २०२६) करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

चेंबूर परिसरात अमर महाल येथे सांताक्रूझ चेंबूर जोड मार्ग उड्डाणपुलाखाली सिग्नल शाळा सुरु करण्यात आली आहे. शाळाबाह्य आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी सिग्नल शाळा ही संकल्पना ठाणे आणि नेरूळ मध्ये समर्थ भारत व्यासपीठ संस्थेने राबवली आहे. आता मुंबईत चेंबूर येथे हा विधायक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याच्या लोकार्पण सोहळ्यास महापौरांसह एम पश्चिम प्रभाग समिती अध्यक्ष आशा मराठे, नगरसेविका कशिश फुलवारिया, उपायुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, एम पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त शंकर भोसले, उपशिक्षणाधिकारी मुख्तार शहा, समर्थ भारत व्यासपीठ संस्थेचे संचालक अजय जोशी, मुख्य कार्यकारी अधिकारी भटू सावंत, उल्हास कार्ले, अदिती दाते, निखिल सुळे, तसेच मुलांना संघटित करण्यात योगदान देणारे आदिवासी पारधी महासंघाचे संतोष पवार यांच्यासह विविध मान्यवर, स्थानिक नागरिक, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.



प्रारंभी महापौरांच्या हस्ते नामफलक अनावरण करण्यात आले. तसेच, प्राथमिक वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर व्यवसाय प्रशिक्षण, लघूउद्योग प्रशिक्षण, पाककला प्रशिक्षण, रोबोटिक लॅब, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा या सर्वांची मान्यवरांनी पाहणी केली. सिग्नल शाळेच्या स्वतंत्र शिक्षण पद्धतीवर आधारित कृती पुस्तकांचे प्रकाशन देखील महापौर तावडे यांच्या हस्ते करण्यात आले. महापौर रितू तावडे म्हणाल्या की, शाळाबाह्य मुलांना एका छताखाली आणणे, हे अतिशय आव्हानास्पद असते. समर्थ भारत व्यासपीठ संस्थेने ठाणे, नेरूळ येथील अनुभव गाठीशी घेऊन मुंबईत आता सिग्नल शाळा सुरू केली आहे. घर नसलेली तसेच परिस्थितीमुळे भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारी मुलं शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे भविष्य सुधारण्याचे अतिशय आव्हानात्मक व विधायक असे हे काम आहे. मागील २४ वर्षांमध्ये या प्रकारच्या प्रयत्नातून अभियंते, व्यावसायिक, क्रीडापटू घडले. त्याचबरोबर या मुलांच्या पालकांना आर्थिक स्थैर्य लाभावे, यासाठी संस्था प्रयत्न करते, हे सगळंच काम अतिशय प्रेरणादायी आहे, असे महापौरांनी नमूद केले. पुढे त्या म्हणाल्या की, मुंबई महानगरात उड्डाणपुलांखाली, तसेच वाहतूक बेटांच्या शेजारी राहणारी अशी मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने ठोस प्रयत्न केले जातील. त्यासाठी मुंबईतील पूल परिसरांचे सर्वेक्षण केले जाईल, जेणेकरून अशा प्रकारच्या किती शाळा सुरू कराव्या लागतील, याची आखणी करता येईल. सिग्नल शाळा सारख्या उपक्रमांना शासन, प्रशासनासोबत समाजातील प्रत्येक घटकाने हातभार लावला पाहिजे. हा उपक्रम निरंतर सुरू राहिला पाहिजे. अशा उपक्रमांचे व्यवस्थापन करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक ती तरतूद केली जाईल. पावसाळ्यात या शाळेला योग्य वातावरण लाभावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी सूचना करुन अधिकाधिक मुलांना या शाळांमध्ये पाठवावे, असे आवाहनही संबंधित पालकांना उद्देशून महापौर रितू तावडे यांनी केले.

प्रास्ताविक उपआयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर यांनी केले. त्या म्हणाल्या की, सिग्नल शाळेसारखा समाज हिताचा प्रयोग ठाणे, नेरुळ पाठोपाठ आता मुंबई महानगरांत राबविण्यात येत आहे. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या आर्थिक साहाय्याने व मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबईतील पहिली सिग्नल शाळा आज सुरु झाली आहे. शिक्षणासोबतच आहार, तंत्रज्ञान शिक्षण, मानसिक स्थैर्य असं सगळं काही या शाळेत पुरवले जाते. परिणामी या मुलांची सर्व त्रासातून सुटका होते. या शाळेतील मुले साक्षर होवून पुढे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये, मुख्य शैक्षणिक प्रवाहात येतील, यावरही भर देण्यात आला आहे. त्यादिशेने या शाळेच्या माध्यमातून पहिलं पाऊल टाकण्यात आलं आहे, असे त्या म्हणाल्या.

# मोफत उपचाराच्या नावाखाली लूट

## 'फुले आरोग्य योजने'त दांडी मारणाऱ्या रुग्णालयांचा आता हिशेब होणार!

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

गरीबांसाठी वरदान ठरलेल्या 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने'ला हरताळ फासणाऱ्या खासगी रुग्णालयांचे धाबे आता दणाणणार आहेत. "जर शासन पैसे देत असेल आणि तरीही रुग्णालये रुग्णांकडून पैसे उकळत असतील किंवा मोफत उपचार नाकारत असतील, तर अशा रुग्णालयांची गय केली जाणार नाही," असा कडक इशारा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत दिला. आमदार अभिजित पाटील यांनी तारांकित प्रश्नाद्वारे या योजनेतील गैरप्रकारांकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते.

राज्य सरकारची 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' आणि केंद्र सरकारची 'आयुष्यमान भारत' या दोन्ही योजना सर्वसामान्य नागरिकांना पूर्णपणे मोफत उपचार देण्यासाठी राबवल्या जातात. मात्र, अनेक ठिकाणी रुग्णालयांकडून तांत्रिक कारणे सांगून रुग्णांची अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. यावर भाष्य करताना मंत्री आबिटकर म्हणाले की, "अशा सर्व तक्रारींची सखोल चौकशी केली जाईल आणि दोषी आढळणाऱ्या रुग्णालयांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल."

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

**-जाहीर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८(३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ-७** मधील 'आर/उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव, 'आर/मध्य' विभागातील ०२ प्रस्ताव व 'आर/दक्षिण' विभागातील ०२ प्रस्ताव म्हणजेच एकूण ०५ प्रस्ताव मा. महानगरपालिका आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण (बीएमसी) / वृक्ष प्राधिकरण (बीएमसी) / महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण यांच्या मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे पुनर्रोपित करणेबाबत तपशील हा महानगरपालिकेच्या mcgm.gov.in बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे Advt. 7 days- W.S.- Z-VII-90 या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ७दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहित नमुन्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच, आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमुन्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in ह्या ई-मेलवरही नोंदवू शकतात.

विहीत मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सूचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई-मेलद्वारे सुचना/आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहु शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि. ०८/०४/२०२६ रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.०० वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व), मुंबई-४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id- dysg.ta@mcgm.gov.in**

**सही/-**
**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

**पीआरओ/३३६९/जाहि./२०२५-२६**

**थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा**

# मुंबईच्या सफाई कामगारांचा वनवास संपला

## घरांच्या मालकी हक्कासाठी मुख्यमंत्र्यांचा 'शब्द'

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

मुंबईची रात्रंदिवस सेवा करणाऱ्या महापालिकेच्या सफाई कामगारांच्या आयुष्यात अखेर हक्काच्या घरांचा प्रकाश पडणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या घरांच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक मोठा आणि सकारात्मक निर्णय घेतला आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने'अंतर्गत मुंबईतील सफाई कामगारांना आता त्यांच्या हक्काची घरे मालकी तत्त्वावर मिळणार असून, या संदर्भातील अधिकृत घोषणा चालू अधिवेशनातच केली जाणार आहे.

मुंबई महापालिकेच्या सफाई कामगारांच्या घरांसाठी म्युन्सिपल मजदूर युनियनने २३ मार्च रोजी आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, हे आंदोलन होण्यापूर्वीच विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या मध्यस्थीने युनियनच्या शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या बैठकीत २००८ आणि २०१५ च्या शासन निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी लावून धरण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रश्नावर अत्यंत संवेदनशील भूमिका घेत सफाई कामगारांना मोठे आश्वासन दिले. मुंबई महापालिका क्षेत्रात एकूण ३६ वसाहतींचे पुनर्वसन पूर्ण झाले असून, त्या ठिकाणी सुमारे १२,२०० नवीन घरे उभारण्यात आली आहेत. यापैकी ५० टक्के घरे ही सफाई कामगारांना मालकी हक्काने देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे हजारो कामगार कुटुंबांना मुंबईत स्वतःचे हक्काचे छप्पर मिळणार आहे.

केवळ आश्वासन न देता, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी येत्या काही दिवसांतच म्हणजेच चालू अधिवेशनात जाहीर केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या महत्त्वपूर्ण बैठकीला विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह म्युन्सिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, वामन कविस्कर आणि हिंदुराव जाधव उपस्थित होते.

मुंबईला स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना आता स्वतःच्या घराची किल्ली मिळणार असल्याने कामगार वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. सरकारच्या या 'श्रमसाफल्य' निर्णयामुळे मुंबईतील ३० हजारांहून अधिक सफाई कामगार कुटुंबांना कायमस्वरूपी स्थैर्य लाभणार आहे.

**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
**Phone:** +91 8433508283 | **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018600** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) श्री राजेश कुमार रवींद्र चक्रवर्ती (कर्जदार) ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती ज्योती गुलाटी चक्रवर्ती (सह-कर्जदार) ११०१, ११ वा मजला, अरुंधती सीएचएस, प्लॉट क्र. ३५, स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई: ४०००७१. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं. ११०१, ११वा मजला, अरुंधती हाइट्स, प्लॉट नं. ३५, स्वस्तिक पार्क, मंगल आनंद हॉस्पिटल जवळ, दीपक कुंदर मार्ग, सीटीएस नं. ३६६/२१, गाव चेंबूर, चेंबूर (पूर्व), मुंबई ४०००७१, मुंबई, महाराष्ट्र, भारत. | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. ३,१५,६१,१११/- (फक्त तीन कोटी पंधरा लाख एकसष्ट हजार एकशे अकरा रुपये) |
| लिलावाची तारीख | १३ एप्रिल २०२६ |
| राखीव किंमत | रु. ३,६५,००,०००/- (फक्त तीन कोटी पासष्ट लाख रुपये) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/- (फक्त पंचवीस हजार रुपये) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | ०६ एप्रिल २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | १० एप्रिल २०२६ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४ वाजेपर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १३ एप्रिल २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १:०० दरम्यान |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: २३ मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता